(31)

# बृहन्मुंबई महानगरपालिका

उप-आयुक्त (परि.-दोन) यांचे कार्यालय, एफ/दक्षिण विभाग कार्यालय, परळ, मुंबई – 400 012.

क्र. एमडीएफ/ओडी/705/जन, दिनांक - 21 .06.2022

## परिपत्रक

विषय :- सार्वजनिक गणेशोत्सव – 2022

संदर्भ :- क्र. एमडीएफ/3483/जन, दिनांक -23.03.2022

विषयांकीत प्रकरणी मा. महानगरपालिका आयुक्तांच्या मंजूरीने सार्वजनिक गणेशोत्सव-२०२२ च्या संदर्भात मार्गदर्शक सूचनांबाबतचे परिपत्रक उपरोक्त संदर्भान्वये निर्गमित करण्यात आले होते.

दि.16.06.2022 रोजी मूर्तीकारांच्या समस्यांसंदर्भात निम्नस्वाक्षरीकाराच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीत निदर्शनास आणलेल्या मुद्यांस अनुसरुन खालील सुधारित सूचना निर्गमित करण्यात येत आहेत –

1) उपरोक्त परिपत्रकास अनुसरुन विभाग कार्यालयाने मूर्तीकारांचे मंडप उभारण्यास दिलेल्या परवानग्या नवरात्रीपर्यंत ग्राह्य धरण्यात याव्यात.
2) ज्या मूर्तीकारांचे अर्ज प्राप्त झाले आहेत त्यांना मूर्ती घडविण्यास पुरेसा अवधी प्राप्त व्हावा यादृष्टीकोनातून परवानगीची कार्यवाही त्वरेने करावी व प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासाठी विशिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी.
3) ज्या मूर्तीकारांनी गतवर्षीच्याच ठिकाणी व गतवर्षीच्याच आकारमानात यावर्षी परवानगी मागितलेली आहे, त्यांना मागील वर्षीच्या परवानगीच्या आधारावर त्वरेने मंडप उभारण्यासाठी परवानगी देण्यात यावी.
4) मूर्तीकारांच्या अर्जाना परवानगी देण्यासाठी विभाग कार्यालयात एक खिडकी योजना चालू करण्यात यावी. नविन स्थळाकरीता (मागील 2021 मध्ये परवानगी नसलेल्या) मूर्तीकारांनी अर्ज केल्यास, त्यांचे अर्ज स्थानिक /वाहतूक पोलीसांचे ना-हरकत प्रमाणपत्रासाठी पाठविण्यात यावेत. स्थानिक /वाहतूक पोलीसांचे ना-हरकत प्रमाणपत्र सात दिवसांत प्राप्त न झाल्यास, त्यांची ना-हरकत गृहित धरून परवानगीची कार्यवाही करावी. मात्र, स्थानिक /वाहतूक पोलिसांकडे अर्ज पाठवितांना त्यामध्ये, 'सात दिवसांत हरकत /ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यास ना-हरकत गृहित धरण्यात येईल' ही बाब स्पष्टपणे नमूद करावी.
5) सदर अर्ज प्रमुख अग्निशमन अधिकारी कार्यालयाकडे पाठवितानासुद्धा वरील (4) मधील सूचनेप्रमाणे '7' दिवसांचा उल्लेख करावा. अग्निशमन दलाच्या ना-हरकत प्रमाणपत्राकरीता शुल्क भरण्याचे निर्देश महापालिकेकडून प्राप्त झाल्यास, सदर शुल्काचा भरणा मूर्तीकारांकडून त्वरीत करण्यात येईल, अशा आशयाचे हमीपत्र मूर्तीकारांकडून घेण्यात यावे (नमुना हमीपत्र सोबत जोडत आहे). प्रमुख अग्निशमन अधिकारी कार्यालयाकडे अर्ज पाठवताना ते सोबत जोडण्यात यावे.

20/6/22

उप आयुक्त (परि.-दोन)

प्रतः-

**सह आयुक्त / उप आयुक्त (परि-1, 3, 4, 5, 6, 7)**, महोदय,

**सहाय्यक आयुक्त (ए ते टी विभाग)**

**अनुज्ञापन अधिक्षक**

**प्रत माहितीसाठी:-**

मा. बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांचे उपायुक्त, महोदय,
मा. अतिरिक्त आयुक्त (शहर), महोदय,
मा. अतिरिक्त आयुक्त (पुर्व उपनगरे), महोदया,
मा. अतिरिक्त आयुक्त (पश्चिम उपनगरे), महोदय,
मा. अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प), महोदय,

उप आयुक्त(परि.-दोन)

<u>हमीपत्र</u>

**<u>(UNDERTAKING)</u>**

**सन २०२२ च्या गणेशोत्सवासाठी मूर्तीकारांच्या मंडपांना परवानगी देतांना 'अग्निशमन दलाचे शुल्क भरण्यास' संमती असल्याबाबत मूर्तीकारांकडून घ्यावयाचे हमीपत्र.**

मंडप उभारणीची परवानगी प्राप्त झाल्यानंतर, अग्निशमन दलाच्या ना-हरकत प्रमाणपत्राकरीता शुल्क भरणे आवश्यक असल्याचे निर्देश महापालिकेकडून प्राप्त झाल्यास आवश्यक शुल्काचा भरणा मूर्तीकारांकडून करण्यात येईल, अन्यथा दिलेली परवानगी काढून घेण्याचे अधिकार महापालिका राखून ठेवत आहे, हे आम्हाला मान्य आहे.

(____________________)

मूर्तीकाराचे नाव ____________________